# प्रेसनोट

दि. २४/०६/२०२३

महावितरण कार्यालय, धानोरी, पुणे येथील सहायक अभियंत्यावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १५९/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अन्वये |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३० वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्रीमती हर्षाली ओम ढवळे, वय ३८ वर्ष, सहायक अभियंता (वर्ग-२) महावितरण कार्यालय, धानोरी शाखा, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/- (वीस हजार रुपये) |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १२,०००/- (बारा हजार रुपये) |

पडताळणी दिनांक :- २५/०५/२०२३, २६/०५/२०२३ व दि. २९/०५/२०२३.

गुन्हा दाखल दिनांक :- २४/०६/२०२३

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे लायझनींगच्या कामासाठी विद्युत ठेकेदाराकडे नोकरीस असून, ग्राहकाचे वीज मीटरची मंजुरी मिळण्यासाठी कागदत्रांची पुर्तता करुन महावितरणच्या धानोरी शाखा कार्यालयात गेले असता, त्या कार्यालयातील लोकसेवक श्रीमती हर्षाली ढवळे, सहायक अभियंता यांनी यापुर्वीचे केलेल्या ०३ थ्री फेज कामाचे व सध्याचे ०१ थ्री फेजचे वीज मीटर मंजुर करून देणेसाठी २०,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक श्रीमती हर्षाली ढवळे, सहायक अभियंता यांनी यापुर्वीचे केलेल्या ०३ थ्री फेज विद्युत मीटर कामाचे व सध्याचे ०१ थ्री फेजचे प्रलंबित वीज मीटर मंजुर करून देणेसाठी तडजोडीअंती प्रत्येकी तीन हजार रुपये याप्रमाणे एकुण १२,०००/- रुपये लाचेची मागणी केली म्हणुन वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला असून, त्यामध्ये त्याना अटक करण्यात आली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रणेता सांगोलकर तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे.